

आकाश खांडके

# अपरिचित

गूढ कथा संग्रह

# अपरिचित

आकाश खांडके

ई साहित्य प्रतिष्ठान

# अपरिचित


नाव - आकाश उमेश खांडके.

पत्ता - ' कृष्णा ' आर - 6

अयोध्या पार्क ,कावळा नाका, कोल्हापूर 416003

फोन - 9552959699

ई-मेल- akashkhandke1@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.



## प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २० ऑगस्ट २०१७



©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

मनोगत



मी आकाश उमेश खांडके.अभियांत्रिकी शिक्षण घेणारा एक विद्यार्थी.मला वाचनाची खूप आवड आहे.चरित्र आणि ऐतिहासिक पुस्तके वाचता वाचता मी कधी गूढकथांकडे वळलो हे माझं मलाच कळलं नाही.रत्नाकर मतकरी यांच्या रंगांधळा या पुस्तकापासून माझं आणि गूढ कथांच एक वेगळंच नातं जडलं.त्यानंतर मी असली खूप पुस्तके वाचली.वाचता वाचता एके दिवशी वाटलं की आपण ही अस काहीतरी लिहिलं तर.त्या विचारातूनच निर्माण झालेल्या या सहा कथा. या कथा तुम्हाला माझ्या एका वेगळयाच विश्वात घेऊन जातील.मी रचलेल विश्व.

आशा करतो तुम्हाला माझं हे गूढ विश्व आवडेल.

- आकाश खांडके.

फोन - 9552959699

ई-मेल- akashkhandke1@gmail.com

कथानुक्रम


मुखवटा

वेगळा

जोशी काकू

एकटा

फोटोग्राफर

राक्षस

( या कथांतील सर्व पात्रे, स्थळे, प्रसंग व नावे काल्पनिक असून, याचा प्रत्यक्ष काही संबंध नाही.
यदा कदाचित तसा काही संबंध आल्यास तो निव्वळ योगायोग समजावे. )


आकाश खांडके
अपरिचित
गूढ कथा संग्रह

# मुखवटा

अस्वस्थ घामाने भिजलेला निखिल ऑफिस संपल्यावर मित्रांबरोबर ठरलेला कार्यक्रम रद्द करून सरळ घराकडे निघाला. महिनाभर आधी ठरलेला कार्यक्रम रद्द झाल्यामुळे मित्रसुद्धा जरा नाराजच होते. पण असल्या कुठल्याही गोष्टीची पर्वा न करता तो सरळ घराकडे निघाला. अगदी मिळेल ती बस मिळेल ती ट्रेन पकडून. आज लिफ्ट बंद आहे म्हणून शिपायाबरोबर बाचाबाची न करता पायऱ्या चढून तो आपल्या पाचव्या मजल्यावर पोहचला. घराच्या दारात पोहचल्यावर मात्र त्याला जरा बरं वाटलं. खिशातला हात कधी बेलवर गेला हे त्याचं त्यालाच कळलं नाही. त्याने खूपदा बेल वाजवली पण त्याचा तसा काहीच उपयोग झाला नाही.

'बहुतेक पल्लवी जवळच तिच्या आईकडे गेली असावी'. असा विचार करून त्याने खिशातून चावी काढली. घामाच्या धारा पावसात भिजल्याप्रमाणे चेहऱ्यावरून ओघळत होत्या. घरात येऊन तो अक्षरशः खुर्ची वर कोसळला.  तिशीतल्या निखिलच्या हृदयाची धडधड अगदी एखाद्या भूत बघून घाबरलेल्या लहान मुलासारखी वाढलेली. त्याला तसं काहीच सुचत नव्हतं. त्याला सध्या फक्त त्याची डायरी पाहिजे होती. हो त्यानं जे पाहिलं होतं ते भूतच होतं. भूतच होतं. भू...त.

निखिल जरा विचित्रच होता. एककल्ली म्हणा किंवा आतल्या गाठीचा. त्याला गोष्टी दुसऱ्यांना सांगण्यापेक्षा लिहून ठेवण्यात जास्त अर्थ वाटायचा. लिहिणं त्याचा छंद होता की एक प्रकारचा सवयीने झालेला नाइलाज, माहित नाही. पण ते जे काही होत ते त्याच्या आयुष्याचा एक भाग झालेला. ती त्याची एक मजबूरी होती. व्यसन होतं...

त्याने आपल्या डायरीच्या कपाटावर नजर टाकली. लाकडी सुंदर कपाट. जे निखिलने खास डायऱ्या ठेवण्यासाठी बनवून घेतलेलं. ते ही अगदी पल्लवीच्या मनाविरुद्ध. तिच्यासाठी ते कपाट म्हणजे निव्वळ खोलीत वाढवलेली एक अडचण होती. डायरी लिहिण्याचा छंद किंवा सवय म्हणा त्याला कॉलेजला जायला लागल्यापासून सुरु झालेली.

आणि त्या सवयीचं पहिलं वहिलं कारण होतं श्रुती. आणि आजच्या दिवशी ती डायरी शोधण्याचंसुद्धा कारण होतं तेच. श्रुती! आज त्याला श्रुती दिसली. आठ वर्षांनंतर. दिसली की भास झाला? पण तोच भास दिवसातून 2 वेळा कसा होईल? दोन्ही वेळा अशा परिस्थितीत ज्यामध्ये तो प्रचंड गर्दीमुळे तिला फक्त लांबूनच बघू शकत होता. पहिल्या वेळी पाहिलं तेव्हा त्याला भास झाल्यासारखं वाटलं. पण हे जरा विचित्र होतं. नाही, हे जरा जास्तच विचित्र होतं. का कुणास ठाऊक, त्याला 2 -3 दिवस श्रुतीची आठवण येतच होती. पण त्याला तिला भेटायची किंवा बहुदा बघायची काहीच इच्छा नव्हती.

दुसऱ्यावेळी मात्र तिची त्याची नजरभेट झाली. तेच टप्पोरे डोळे. भेदक. काजळी काळया जादूचे. निखिलच्या पाठीच्या मणक्यातून एक थंड्गार विजेचा प्रवाह झर्रकन पायापर्यंत गेला. हातपाय लुळे पडले. सगळी विचारशक्ती बंद, आणि सगळे जग गरगरा फ़िरायला लागले. कितीतरी वेलाने तो भानावर आला तेव्हा समोर कोणीच नव्हतं. म्हणजे वाह्ती गर्दी फ़क्त होती आणि त्याच्याकडे विचित्र नजरेने पहात पुढे जाणारे लोक. श्रु नव्हती. तो भास होता? भास? की भूत?

या विचारात असतानाच त्याच लक्ष कपाटाकडे गेलं.

त्याच्या म्हणा किंवा परिस्थितीच्या दुर्दैवाने म्हणा त्याची लिहिती डायरी कालच संपलेली. काल रात्री ठरवून सुद्धा आजच्या धावपळीत तो नवीन डायरी आणायची पूर्णपणे विसरलेला. नवीन डायरी नसल्यामुळे त्याच्या डोक्यात वेगळेच विचार चालू झाले. त्यातच त्याने कॉलेजच्या वेळची श्रुतीबद्दल लिहिलेली डायरीसुद्धा शोधायचा प्रयत्न केला. पण आज नशीब खरंच खराब होतं त्याचं. निखीलला आज ती डायरीसुध्दा सापडत नव्हती. तसं त्याच्या डायरीच्या कपाटाला कोणीही हात लावत नसे.

डायरी लिहायचा व शोधायचा नाद सोडत तो टेरेसवर जाऊन गार हवेचा आस्वाद घेत बसला. आज त्याने श्रुतीला बघितलेलं, खूप स्पष्ट बघितलेलं. विचार करत करत तो आपल्या डायरीच्या जुन्या मजकुराप्रमाणे आपल्या कॉलेजच्या दिवसात गेलासुद्धा.

डोक्यातल्या डायरी ने भूतकाळाचा वेध घ्यायला सुरवात केलेली.

त्याने डोळे घट्ट मिटले. त्याला आपोआप डायरीची एक एक ओळ दिसायला लागली...

----------------------

11 जुलै 1996

आज मी पहिल्यांदा डायरी लिहितोय. कारण आज घडलेली गोष्ट मी कुणाला ही सांगू शकत नाही. आज एका कामानिम्मित माझी एका मुलीशी ओळख झाली. अं-हं माझी ओळख एका सुंदर मुलीशी झाली. अप्सराच जणू स्वर्गातून उतरलेली. श्रुती देसाई. म्हणजे कॉलेजच्या पर्यावरणाच्या सरांनी एका प्रोजेक्टसाठी ओळख करून दिली आमची. खरं सांगायचं तर मला त्या प्रोजेक्टमध्ये काहीही रस नव्हता. सरांना कसं नाही म्हणायच मी याच विचारात असताना श्रुती पहिल्यांदा सरानबरोबर माझ्या समोर आली. मी पुढे काहीच बोलू शकलो नाही. खूप वाढवण्यात अर्थ नाही. मला वर्णन वैगेरे करता येत नाही. मी कवी नाही. पण आज तिला बघून असं वाटलं की, मी एका क्षणात तिच्या प्रेमात पडलोय. तिला बघून मनात काही विचित्र हालचाली सुरु झाल्या. पूर्ण वेळ मी तिच्याकडे बघण्यातच घालवला. तिचे टपोरे डोळे म्हणजे जादूचे दिवे होते. माझ्या काळजाचा ठाव घेत असल्याप्रमाणे ते माझ्या आत खोल खोल काही शोधत होते. आणि डोळ्यांत काजळ नव्हतंच. काळी

जादू होती. ओठांतून येणारे अगदी साधे साधे सब्दसुद्धा मला मंत्रांप्रमाणेच वाटत होते. त्या मंत्रांनी मी तिच्या जवळ ओढला जात होतो. तिच्या नाजुक हातांच्या हालचाली अगदी साध्या असल्या तरी मला मात्र वाटत होते की ती काही जादूचे मंत्र माझ्यावर फ़ेकते आहे.

खूप छान होती ती. मजेचा भाग म्हणजे मी तिला भेटल्यावर लग्नापर्यंतचा विचार करून ठेवला. मूर्खच आहे मी. मनातल्या मनात सरांचे आभार सुद्धा मानले.

' तू माहिती गोळा कर. आपण 4 दिवसांनी भेटू ' ती जाताना म्हणाली. एक हलकीशी स्माईल देऊन ती निघून गेली. ती तर गेली पण जाताना माझं हृदय घेऊन गेली 4 दिवसांसाठी. ते स्माईल म्हणजे आतापर्यंतच्या सर्व मंत्रोच्चारांवरचं शिक्कामोर्तब होतं. तथास्तु होतं. आमेन होतं.

----------

16 जुलै 1996

शेवटी एकदाचे 4 वर्षांसारखे 4 दिवस संपले. आज मला जाणवलं की 4 दिवस आणि चार रात्री मी फक्त श्रुतीचा विचार करण्यात घालवले. म्हणजे बाकी मी काहीच केलं नाही. अगदी

प्रोजेक्टच काम सुद्धा नाही 'तू काय काय माहिती काढलीस? ' तिच्या या प्रश्नाचीच मला भीती वाटत होती कारण माझ्याकडे काहीच उत्तर नव्हतं. मला वाटलं ती चिडेल, पण नाही. ती हसली. इतकं गोड हसली की मी खलासच झालो. माझं हृदय बंद पडायला आलं.

बहुदा तिला कारण कळाल असावं. मुली हुशार असतात असं म्हणतात. आज मी ते अनुभवलं.

' असुदे. पण पुढच्या वेळेस असं करू नको निखिल. आपला प्रोजेक्ट होणार नाही बघ नीट. सर आपल्याला ओरडतील. मी काम चालू करते. तू माहिती काढलीस कि आपण भेटू. कॉफी पण पिऊ त्या दिवशी. '

तिने खूप छान प्रकारे समजावलं मला. या वेळेस मात्र मी नक्की काम करणार. कॉफी प्यायची आहे ना मला श्रुती बरोबर.

---------------

20जुलै 1996

आज एका शहाण्या मुलासारखं मी सगळं काम करून गेलो. अगदी झटून. हे काम पण मी स्वतःच्या स्वार्थासाठीच केलेलं. श्रुती बरोबरची ती कॉफी आणि काम झालेल्याचं तिच्या चेहऱ्यावर उमटणारं हसू मला पाह्यचं होतं. तेच माझं बक्षिस होतं. तेच माझे मार्क्स होते. माझा फ़र्स्टक्लास होता. माझी डिगरी होती. तिचं स्माईळ हे माझ्यासाठी सर्वस्व होतं. स्वर्गसुख होतं.

माझ्या कल्पनेप्रमाणे श्रुती खूप खुश झाली माझ्यावर. आता तशी आमची चांगली मैत्री झाली आहे. आज आम्ही 3 तास कॉफी पीत पीत गप्पा मारत बसलेलो. तिने खूप काय काय सांगितलं तिच्याबद्दल मला. तीचं कुटुंब, मित्र मैत्रिण, आवडी निवडी आणि बरंच काही. आपल्या होणाऱ्या जीवनसाथीला सांगावं तसं ती सर्व सांगत होती. अगदी खोलवर मनात राहिलेलं. त्यातल्या कितीतरी गोष्टी मला आठवत सुद्धा नाहीत कारण मी तिच्या डोळ्यात पुर्णपणे हरवलेलो. शब्द कानावर पडत होते पण मेंदूवर तिची जादू असल्यामुळे मेंदू पर्यंत पूर्णपणे पोहचत मात्र नक्की नव्हते. मीही माझ्या नकळत माझं मन उघडं करत होतो.

कॉफी पिताना माझा हात तिच्या हातावर पडला. अगदी नकळत आणि तेही चुकून. मला जरा भीती वाटली. पण ती

हसली. ' तू खूप चांगला आहेस निखिल. आज काल अशी मुलं नाही बघायला मिळत.' तिच्या या वाक्याने तर मी पुरता भारावून गेलो. पहिल्यांदा माझं कौतुक झालेलं आणि ते सुदधा श्रुतीच्या तोंडून.

मीच घाबरत घाबरत विचारलं “परत कधी भेटायचं?”. कारण प्रोजेक्ट छोटा असल्यामुळे बघायला गेलं तर काम आमच्या बाजूने संपलेलं. आता काम सरांचं होत. त्यामुळे भेटायला तसं काही कारण नव्हतं. तिच्या नकाराचीच जास्त भिती होती मला.

पण ती म्हणाली भेटू ना एका आठवडयात. घरी ये माझ्या रविवारी. हे ऐकून मी खूप खुश झालो. पण ते मी चेहऱ्यावर मुक्तपणे नाही दाखवलं. उगंच तिला काही विचित्र वाटायला नको म्हणून. पण मनातून आनंदाच्या फ़टाक्यांची माळ धडाडा वाजत होती. मी तरंगतच घरी आलो.

----------------

22जुलै 1996

रविवार कधी येणार?????? आजकाल एक एक दिवस वर्षासारखा जातोय. हे असं प्रेमात होतं म्हणून ऐकलेलं पण आता मी ते स्वतः अनुभवत होतो.

रविवारी मी तिला सांगणार कि तू मला खूप खूप आवडतेस श्रुती. श्रुती नाही नुसत श्रु म्हणणार. प्रेमाने प्रेमाचा शब्द.

कॉलेज मध्ये आम्ही एका तुकडीत हवे होतो.

ती मैत्रिणींबरोबर असल्यामुळे तिच्याबरोबर बोलताच येत नाही.

पण असुदे रविवार लांब नाही.

-------------

27जुलै 1996

श्रुने केलेलं जेवण. वाह! तिने स्वतःच्या हाताने जेवण केलेलं माझ्यासाठी. श्रु सारख्या मॉडर्न मुलीला जेवण करता येतं या गोष्टीचं मला खूप कौतुक वाटलं. हॉस्टेल मध्ये राहणारा मी. तिचं जेवण अगदी घरच्यासारखं वाटलं. आज श्रु जरा जास्तच सुंदर दिसत होती. मी येणार हे तिने घरी सांगितलेलं. घरातले सगळेच छान आहेत तिच्या. खूप खूप गप्पा मारल्या आम्ही. पण सगळी असल्यामुळे मी माझ्या मनातील गोष्टी नाही सांगू शकलो. रात्री ती मला सोडायला घराबाहेर आली. तिने आज

चक्क मला मिठी मारली. माझे पुरते हाल करून सोडले वेडी ने. तिचा तो स्पर्श खूप खूप मोहक होता.

मी काहीच, काहीच बोलू शकलो नाही.

आज रात्री श्रु गावाला निघाली आहे. 4 महिन्याने येणार. तिने मला तिचा नंबर दिलाय.

ते 4 दिवस जाताना माझे हाल करून गेले. हे 4 महिने आता काय करणार? ? खूप अवघड आहे तिच्या शिवाय जगणे.

--------------

12नोव्हेंबर 1996

उद्या श्रु येणार. या 4 महिन्यात असा एकही दिवस गेला नाही की आम्ही एकमेकाबरोबर बोललो नाही. तिला मी आवडतो हे तर नक्की. तरीपण मी उद्या तिला माझ्या मनातील सगळं एकदा मोकळेपणाने सांगणार. त्या नंतर मी आणि श्रु. बाकी कोणीही नाही.

-------------------

13नोव्हेंबर 1996

आज फार विलक्षण गोष्टी घडल्या. श्रुने फोन करून मला भेटायला बोलावलं. कॉलेजच्या मागच्या डोंगरावर जिथे आम्ही एकदा भेटलेलो. खूप सुंदर डोंगर आहे तो. उंच, वेगवेगळ्या फुलांने बहरलेला. तो डोंगर मला खूप आवडतो. त्यामागच्या दरीतून ढग तरंगत असतात. खऊप खाली छोटॊ गांवं दिसतात. म्हणूनच श्रुला आधी एकदा मी तिथे घेऊन गेलेलो. मनातल सगळं सांगण्यासाठी. पण त्या वेळेस मी काहीही बोलू शकलो नव्हतो. आज परिस्थिती वेगळी आहे. मी तिच्या आवडीचा शर्ट घालून, एक छानसं फुल घेऊन गेलो.

जाताना किती स्वप्न रंगवून गेलेलो. तिथे गेलो तर श्रु माझी वाट बघत उभारलेली. त्या फुलांमध्ये त्यातीलच एक फुल बनून. खूप खूप सुंदर दिसत होती. तिच्या बरोबर कोणी तरी आलेलं. मी समोर गेलो आणि ती हसली. मला एक कडक मिठी मारत आणि त्या मुलाकडे बोट दाखवत ती म्हणाली “हा माझा बॉयफ्रेंड.” हे ऐकताक्षणीच माझ्या तळ पायाची आग मस्तकात गेली. माझ्या मस्तकात आगीचा लोळ उठला. सारी सारासार विचारशक्ती बधीर झाली. माझ्या नकळतच मी हललो.

मी, मी मूर्खासारख कशाचा कशाचा विचार न करता तिला मागे ढकलं अगदी अंगातली सगळी शक्ती एकवटून.

पायाचा तोल जाऊन ती त्या उंच डोंगरावरून खाली कोसळली. बरोबरचा मुलगा विलक्षण घाबरला. ' अरे ती थट्टा करत होती मी तिचा मित्र आहे. काय काय केलंस हे. मी मी खूप घाबरलो काय केलं हे मी. आणि का? एवढा राग ? माझी श्रु. आता मी काय करणार? तो मुलगा जोरात जोरात ओरडत रडायला लागला. एका क्षणासाठी मी शांत झालो आणि दुसऱ्याच क्षणी त्याला ही ढकलून दिल.

-------------------

सगळं संपल, नाही, मी संपवलं. मला ही जगण्यात काही अर्थ वाटला नाही. पण मरायची हिम्मत नव्हती.

त्या नंतर मी असा जगलो कि काही घडलंच नव्हतं. आज आठ वर्षांनी श्रुती दिसली. पण हे, हे कसं शक्य आहे? ?

हा विचार चालू असतानाच टेरेस चा दरवाजा उघडून एक व्यक्ती आत आली. रात्र झाल्या मुळे अंधारात काही दिसत नव्हतं. निखिल विचारात एवढा मग्न

झालेला की लाईट लावायचं सुद्धा भान नव्हतं राहील त्याला. तो तसाच अंधारात बसलेला.

निखिल ने लाइट लावली तर समोर श्रुती उभी होती एका हातात डायरी पकडून आणि दुसऱ्या हातात चाकू.

तो घामाने अक्षरशः भिजला. श्रुतीचं भूत या कल्पनेनेच तो अर्ध मेला झाला. श्रुती श्रुती माझं चुकलं. येणारी आकृती थांबली.

तोंडाकडे हात घेत तिने मुखवटा काढला. ती निखिल ची बायको पल्लवी होती..

परवा श्रुतीच्या आठवणीत वाचायला काढलेली डायरी बाहेरच राहिली. ती तिने वाचली. त्यात श्रुतीचा फोटो सुद्धा होता.

पल्लवीचा आपला नवरा असं काही करेल या गोष्टीवर विश्वासच बसत नव्हता. निव्वळ एक परीक्षा म्हणून तिने हे केलं. पण नवरा त्यात नापास झाला. पुढे आलेली पल्लवी थांबली.

निखिलला सगळं कळून चुकलं. पल्लवीला समजवायला तो तिच्या जवळ गेला. त्याने तिला मिठी मारली. ती चिडलेली आणि ते चिडणं स्वाभाविक होतं. हे निखिलला सुद्धा कळत होतं. त्याचा भूतकाळ तिला त्रास देत होता. कुठल्या बायकोला खुनी नवरा म्हणून आवडेल? तिच्या डोळयातून वाहणारे अश्रू सगळं काही बोलत होते.

निखिलची मिठी घट्ट झाली. पल्लवीचा राग निवळत होता. तिने डोळे उघडले. आणि पुढच्याच क्षणाला सगळं बदललं. ती हवेतून कोसळत होती.

दुसरा पर्याय नव्हता ना निखिल कडे.

कारण अगदी त्यादिवशीसारखी स्वतः मरण्याची आजसुद्धा हिम्मत नव्हती त्याच्यात.....

# वेगळा

तुम्ही, तुम्ही ऐकून घ्याल ना माझं म्हणणं? का तुम्ही पण त्या बाकीच्या मूर्ख बिनडोक लोकांसारखं मलाच वेड्यात काढणार आहात?

अं हं... लोक मला वेड्यात काढत नाहीत. ते मला पूर्णपणे वेडाच समजतात. आणि मला वेडा का म्हणतात असं विचारलं तर त्यांच उत्तर असत कि मी काहीही बडबडतो. म्हणजे थोडक्यात माझं म्हणणं त्यांना कळत नाही, समजत नाही, त्यांची ते बोलणं समजून घेण्याची कुवत नाही म्हणून ते मला वेडा म्हणतात. चोराच्या उलट्या बोंबा.

मी एक सभ्य माणूस आहे. हां, पुढे सांगायच्या आधी एक गोष्ट सांगायला हवी. म्हणजे सांगण्यापेक्षा विचारायला हवी. सभ्य म्हणाल्यावर तुमच्या डोळ्यांसमोर एक सूट बूट घातलेला हळू आवाजात विनम्रपणे बोलणारा माणूस आला असेल. अहो येणारच. कारण लहानपणापासून आपण हेच बघत आलोय. पण माफ करा मी तसा नाही अगदी अजिबात नाही. माझे कपडे खूप फाटलेत अगदी पोतेरा, चिंध्या, कचरा झालाय त्यांचा. आणि राहिली गोष्ट विनम्र बोलण्याची तर ते मला कोणी बोलूच देत नाही. तरीपण मी सभ्य आहे. कारण मी या खोट्या लोकांनी बनवलेल्या खोट्या नियमांना मानत नाही.

आता काय म्हणलो मी. कायsss बोललो बरं. आजकाल ना मी गोष्टी खूप लवकर विसरतोय. परवा तर मी माझ्या घरचा पत्ताच विसरलो. घर कसलं ते, झोपडीच म्हणायला पाहिजे. माझ्याच बायको मुलांनी मलाच घरातून हाकलून दिलं. का तर म्हणे मी माझ्याच घरी पैशांची चोरी करतो आणि काहीही बडबडतो, खोटं बोलतो. हां हां आठवलं मी खोटं या शब्दावर काहीतरी सांगत होतो. आता सगळं आठवलं. बरोबर आठवलं. तुम्हाला सांगतो मी. फक्त एकच करायचं. माझं पूर्ण बोलणं शांतपणे ऐकून घ्यायचं. ऐकताय ना?

मला असं वाटतं, म्हणजे माझा असा विश्वास आहे की आपल्या आजूबाजूचं सगळं विश्व सगळं सगळं खोट आहे. असं काही अस्तित्वातच नाही. हे सगळे आपल्या मनाचे खेळ आहेत. आपण एखाद्या गोष्टीचा विचार करतो म्हणून ती आपल्याला दिसते. आपण आहोत म्हणून हे सारे विश्व आहे. मेलेल्या माणसाचं विश्व संपलं असं म्हणतात. म्हणजे हे सगळं विश्व त्याच्याशी नाहीतर त्याच्या अस्तित्वाशी जुडलेलं होतं. तो आहे तर मग विश्व सुद्धा आहे. तो नाही मग काहीच नाही.

डोकं गरगरायला लागलय का तुमचं? पण एवढ्या शांततेत वाचताय माझं म्हणणं ऐकताय म्हणाल्यावर तुम्ही नक्कीच हुषार आहात अगदी माझ्यासारखे.

आता असा विचार करून बघा एक व्यक्ती आहे तो तुम्हाला खूप खूप आवडतो तुम्ही त्याच्यावर प्रेम करता रोज बोलता. त्याचा आवाज ऐकल्याशिवाय तुमचा दिवस जात नाही. आणि समजा एके दिवशी तो मेला. म्हणजे तो मेला असं

तुम्हाला कळलं. तुम्ही जर त्याच्या अगदी जवळचे असाल तर लगेच कळेल. पण जर तुम्ही त्याचे दूरचे नातेवाईक किंवा जुजबी मित्र असाल आणि तुमच्यात फ़ार जास्त संपर्क नसेल तर कदाचित तुम्हाला एक महिना किंवा एक वर्षानंतर कळेल तो मेल्याचं. मग एक महिनाभर तुम्हाला तो नसलेल्याचा त्रास होईल पण तुम्ही त्याला विसरून जाल. म्हणजे थोडक्यात तो जिवंत आहे असं तुम्ही मानून चाललेला म्हणून तो होता. तो मेला असं जेंव्हा तुम्ही स्वतःला समजावलं त्या वेळेपासून तो संपला. तुम्ही त्याला विसरला.

अहो तो, त्याचं जगणं आणि मरणं सगळं तुमचे विचार होते. तो असा कोणी कधी नव्हताच. मला माहित आहे आता तुमच्या कपाळावर आठ्या यायला सुरुवात झाली आहे. आणि तुमचं डोकं तुम्हाला सांगतंय कि हा माणूस मूर्ख आणि वेडा आहे.

बरोबर आहे ना माझं म्हणणं? ? पण नाही. तुम्ही चुकताय.

मी हे लोकांना सांगायचा किती प्रयत्न केला पण कुणाला माझं बोलणं काळतच नाही. मूर्ख मूर्ख लोक. अहो मज्जा बघा ना मी माझं म्हणणं अश्या लोकांना पटवण्याचा प्रयत्न करतोय जे नाहीच आहेत. त्यांच असणं माझ्या विचारावर निर्भर आहे. मी म्हणतोय म्हणून ते आणि तुम्ही आहात.

बरं, ठीक आहे आता बास करतो मी. पण तुम्हाला माझं म्हणणं पटलं नाही हे मला पण माहित आहे. तुम्हाला पटवण्याचा एक छोटासा प्रयत्न करतो.

माझ्यापुढे हि बंदूक आहे. आता हे नका विचारू कि ती माझ्याकडे कुठून आली. ती मी माझ्याच मुलाकडून चोरली. तो पोलीस आहे. ते सगळं सोडा.

आता मी याच बंदुकीने स्वतःला गोळी मारणार आहे. पण मला काही होणार नाही. कारण ही बंदूक आहे असं तुमचा विचार आहे. पण मला माहित आहे की हा फक्त माझ्या मनाचा खेळ आहे. गोळी मला लागणारच नाही कारण गोळी अस्तित्वातच नाही. बास बास खूप बोलणं झालं. मला मूर्ख म्हणता ना आज मी तुम्हाला पटवून देतो कि मला जे कळलंय ते तुम्हाला कधीही कळालं नसत जर मी नसतो तर.

हे बघा मी बंदूक ऊचलली आहे. बंदूक लोड करून पोटाला लावली आहे. आता मी ट्रिगर दाबणार आणि तरीही मला काही होणार नाही.

मग  तुम्हाला माझं म्हणण पटेल. आणि हे मी ट्रिगर दाबल.

आssssss.

वाच... वा... वाचवा मला................

# जोशी काकू

दोनच्या सुमारास राजला जाग आली. खोलीमध्ये पूर्ण अंधार पसरलेला. राजला तहान लागलेली. उठताच क्षणी त्याने लाईट लावण्यासाठी झोपेतच स्वीचबोर्डवर हात फिरवला, सगळी बटणं दाबली. पण लाईट काही लागली नाही. अंधारामुळे राज जरा घाबरला. तहान तर लागलेली आणि त्यात लाईट पण गेलेली. काय करावं या विचारातच त्याने अंधारातच पाण्याची बाटली हाताने चाचपडत शोधली. त्याच्या सुदैवाने त्याला ती सापडली सुद्धा. भरपूर पाणी पिऊन तो परत बेडवर पडला.

12 वर्षांचा राज झोपायचा प्रयत्न करत होता पण तेवढ्यात त्याला ओरडण्याचा, भांडण्याचा आवाज आला. आवाज थोडा जोरात आणि विचित्रच होता. दुसरं काही नसलं तरी राजला घाबरवण्यासाठी तो आवाज पुरे होता. तो एकदम दचकून उठून बसला. जरा लक्ष देऊन ऐकल्यावर तो आवाज मागच्या जोशी काकूंच्या घरातून येतोय हे त्याला जाणवलं.

मध्यमवयीन, साध्या, सोज्ज्वळ, काळ्या सावळ्या जोशी काकू हा त्याच्यासाठी एकदम जिव्हाळ्याचा विषय होता.. आणि का नसणार? लहान मुलांना तुम्ही प्रेम दिलं की ती सुद्धा त्याच्या बदल्यात तुम्हाला प्रेमच देतात. जोशी काकू आणि राजचं असंच काहीतरी नातं होत. प्रेमाच नातं. मैत्रीच नातं. जोशी

काकूंबद्दलची एक उल्लेखनिय गोष्ट म्हणजे त्या कधी जास्त घराबाहेर नसायच्या.. कदाचित त्यांना एकांत आवडत असावा.. कदाचित एकांताला त्या आवडत असाव्यात.

आपण भलं आपल घर भलं या धोरणावर जगणारी ती बाई.. थोडक्यात काय तर आजच्या बायकांपेक्षा त्या खूप वेगळया होत्या. मनाने जेवढी चांगली तेवढी गरीब सुदधा...

पण कुणी त्यांच्याबरोबर जास्त बोलायचंच नाही.. वेगळी लोक वेगळीच राहतात. बहुदा समाज त्यांना वेगळा ठेवतो. जोशी काकू याला अपवाद नव्हत्या. मुळीच नव्हत्या.

त्यांचं राजवर मात्र फार प्रेम होतं... खेळता खेळता बॉल जोशी काकूंच्या घराकडे गेला की तो शोधून आणायच काम राजकडेच असायच. बाकीची मुलं तिकडे जायला तयार नव्हती होत. याचं करण राजला मात्र कधीच कळलं नाही. तो उलट आनंदाने तिकडे जायचा. त्यानिमित्ताने काकूंना भेटायचा. तेही आई पासून चोरुन. आईला त्या का आवडायच्या नाहीत हे पण एक न सुटणार कोडंच होत राजसाठी.

जेंव्हा जेंव्हा तो काकूंना भेटायचा, त्या राजला काही ना काही तरी नक्की खायला घालायच्या... त्याच्याबरोबर थोडं फार बोलायच्या.. कदाचित त्या राजमध्ये स्वतःचा मुलगा शोधायच्या.

त्यांचा स्वतःचा एकुलता एक दहा वर्षाचा मुलगा हरवलेला.. त्यांच्या पासून, त्यांच्या प्रेमापासून दूर झालेला. ती एक निव्वळ चूक होती.. गावात जत्रा भरलेली. करण, जोशी काकूंचा मुलगा त्यांच्या पुढे जत्रेला जाण्यासाठी हट्ट धरून बसला. त्यांनी करणला समजावण्याचा प्रयत्न सुद्धा केला की तिथे खूप गर्दी असते पण तो काहीही ऐकून घ्यायला तयार नव्हता. आई तरी मुलाला किती नाही म्हणणार. शेवटी ती दोघे जत्रेला गेले. गावाच्या जत्रेत खेळण्यांच्या मागे पळताना पुढे काय होणार ह्याची ना त्याला कल्पना होती ना त्याच्या बरोबर असलेल्या जोशी काकूंना..

त्या प्रसंगाने त्यांचं सगळं जीवनच बदलून टाकलं.. त्यांच्या करण त्यांच्या पासून दुरावला. ज्या गोष्टीची भीती होती तीच झाली. करण त्या असंख्य गर्दित हरवला. काकूंनी त्याला खूप खूप शोधला. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. भरलेल्या डोळयांनी आणि जड अंतकरणाने त्यांनी घडलेला सगळा प्रसंग आपल्या नवऱ्याला सांगितला. नवऱ्याने त्यांना समजून घ्यायचं सोडून सगळा दोष त्यांच्यावरच टाकला.. रागात त्याने काकूंना खूप खूप मारलं. मूल हरवलेल्याचं दुःख आणि त्यावर नवऱ्याने लावलेला आरोप या सगळयाच्या मनस्तापात ती माउली पूर्णपणे खचली.. त्यांच्या जगण्याला काहीही अर्थ नव्हता राहिला. करण परत येईल या एका आशेवर त्या जगात होत्या. छोटं गाव म्हणल्यावर गोष्टी पसरायला किती वेळ लागणार.

आजूबाजूच्या लोकांनी तर हे सुदधा बोलायला कमी केलं नाही की, काकूंनी मुद्दामच त्याला हरवला. कारण त्यांचं मोहनरावांबरोबर जबरदस्तीने लग्न

लावलं गेलेलं.. लोकांना बोलायला चर्चेला मुद्दाच लागतो. आणि या पेक्षा चांगला मुद्दा त्यांना काय मिळणार.

एखाद्याला घरातल्यांनी एकदा वाळीत टाकलं कि सगळा समाज त्याच्या विरुद्ध होतो.. जोशी काकूंचं पण असंच काहीतरी झालेलं.. काकू पूर्ण पणे खचलेल्या.

नवरा दिवसभर दारू प्यायचा आणि रात्री मुलाची आठवण काढून काकूंना मारायचा.. हा तर नित्याचा कार्यक्रम होता..

राज तसा छोटा होता पण भांडण म्हणजे काय हे त्याला चांगलच कळलेलं..

दोन - तीन दिवसांपासून तर परिस्थिती फारच बिघडलेली.. काकूंचं तर जगणंच अवघड झालेलं... भांडणं खूप वाढलेली..

पण आज जे राज खिडकीतून बघत होता ते थोड निराळंच होतं.. नीट दिसत नव्हतं अंधारामुळे, पण एवढं नक्की होत की आजचं भांडण वेगळयाच दिशेला निघालेलं..

बघता बघता राज एकदम दचकला कारण मोहनराव जोरात ओरडले... वेदनेने जोरात किंचाळले..

आणि रक्ताचे शिंतोडे खिडकी वर उडाले.. राज त्याच्या घराच्या खिडकीत दोन पावले मागे झाला. त्याला दरदरून घाम फुटला.. काय झालं असावं ह्याचा त्याला थोडाफार अंदाज आलेला.

तो भरपूर वेळ काकूंच्या खिडकीतून आत बघायचा प्रयत्न करत होता.

पण नंतर पसरली ती स्मशान शांतता..

या सगळया गोष्टी त्याच्या बुद्धीच्या बाहेरच्या होत्या.. त्यानंतर काय झालं हे त्यालाही कळलं नाही.

सकाळी जाग आल्यावर पहिलं त्याचं खिडकी कडे लक्ष गेलं..

काल झालेल्या प्रसंगाने त्याला सकाळी सुद्धा घाम फुटला.. काल बघितलेलं स्वप्न होत का सत्य हेही त्याला कळेना. पण---

काल बघितलेला सगळा प्रकार त्याला आईला सांगायचा होता.. आपलं मन मोकळं करायचं होतं. पण कसं सांगायचं आणि नेमकं काय सांगायचं हेच त्याला कळेना.. हे सगळं ऐकून आई काय प्रतिक्रिया देणार हे ही त्याला कळत नव्हतं.

आईला काहीही न सांगता त्याने रोजच्या प्रमाणे दिवसाची सुरुवात केली. अंघोळ करून आवरून तो शाळेला गेला.

शाळेत दिवसभर तो जरा घाबरूनच होता.. त्याचं कशातही लक्ष लागत नव्हत. रात्रीचा विचार त्याच्या दिवसात घर करुन बसलेला. पाच वाजता शाळा सुटली. दप्तर अडकवून संध्याकाळी शाळेतून घरी येताना कळत नकळत त्याचं लक्ष जोशीकाकूंच्या घराच्या खिडकी कडे गेलं..

त्याने बघितलं तर तिथे जोशी काकू उभ्या होत्या, राजकडेच बघत त्या हसल्या.. जरा विचित्रच हसल्या असं राजला वाटलं. कालच्या प्रसंगामुळे त्याला जरासुद्धा हसायची इच्छा नव्हती पण नाइलाजाने तो हसला..

काकूंनी हातवारे करून त्याला खिडकीजवळ बोलावलं.. जड पायांनी काय करावं या विचारात तो तिकडे गेला.. काकू एकटक त्याच्याकडे हसत बोलल्या ' काल काय बघितलंस रात्री ? ? '

त्यांच्या या प्रश्नाने राज एवढा घाबरला की काहीही न बोलता तो सरळ घरी पळाला.. पळताना त्याने एकदाही वळून पाहिलं नाही. घरात पोहचेपर्यंत त्याला धाप लागलेली. तोंडाला घाम फुटलेला. दरवाज्यावरील धड धड ऐकून आईने दरवाजा उघडला.

त्याची झालेली अवस्था बघून आईसुद्धा घाबरली.. काय झालं म्हणून आई त्याला सारख सारख विचारात होती.

पण राज मात्र काहीच बोलायला तयार नव्हता..

' काल काकूंनी काकांबरोबर काय केलं हे आपल्याला दिसलं.. आणि हे त्यांना माहित आहे.. आता आपलं काही खरं नाही... त्या मारणार, मला पण मारणार.... '

राजच्या डोक्यात ह्या पलीकडे दुसरा काही विचारच येत नव्हता.. सगळं आईला सांगावं का? ? तिला पटेल? ?

राजचं कोणत्याच गोष्टीत लक्ष लागत नव्हतं.. मनाला एक वेगळीच रुखरुख लागलेली त्याच्या.

न जेवताच तो झोपायला गेला.. खूप वेळ लोळून सुद्धा त्याला झोप येत नव्हती. विचार करत करत तो झोपायचा प्रयत्न करत होता... दोनच्या सुमारास त्याला झोप लागली पण काही क्षणात तो परत एकदा कालच्यासारखा दचकून उठला.

आज सुद्धा जोशी काकूंच्या खिडकीतून आवाज येत होता.. पण तो भांडणाचा नसून खेळण्याचा होता.. राजला हे जरा विचित्रच वाटलं.

... लक्ष देऊन ऐकल्यावर बघितल्यावर कळलं की काकू कुठल्यातरी छोट्या मुलाबरोबर खेळत होत्या..

क्षणासाठी वाऱ्याने खिडकीवरचा पडदा हालला.. आणि राज परत एकदा दचकला.

कारण तो तर करण होता.. काकूंचा हरवलेला मुलगा.. म्हणजे तो सापडला... पण कधी? ? कुठे? ? कसा? ? राजच्या मनात असंख्य प्रश्न निर्माण झालेले. पण दुर्दैवाने त्याच्याकडे कशाचही उत्तर नव्हतं.

राज चक्कर येऊन पडला.. तो शुद्धीवर आला त्या वेळेस सकाळ झालेली..

आता हे सगळं त्याला असह्य झालेलं...

आता आईपासून काही लपवायचं नाही असा विचार करत तो घरभर आईला शोधायला लागला.. आई बाबांच्या खोलीबाहेर आल्यावर त्याला जाणवलं की ते दोघे आत काहीतरी बोलत बसलेत. तोही ऐकू लागला.

आई सांगत होती..

' तुम्हांला कळलं का हो? ? परवा जोशींच्या हरवलेल्या मुलाचा मृतदेह सापडला पोलिसांना... खूप वाईट अवस्थेत गावामागच्या जंगलात पडलेला सापडला.

त्या नंतर रात्री झालेल्या भांडणात जोशींच्या बायकोने नवऱ्याच्या त्रासाला आणि तिच्यावर लागलेल्या आरोपांना कंटाळून नवऱ्याचा खून केला... आणि सगळं संपलं म्हणून स्वतः फॅनला गळफास लावून आत्महत्या केली...

हे बघा पोलीस चौकशीतून मिळालेल्या माहितीची बातमी आली आहे पेपरमध्ये... आई बाबांना दाखवत होती.

खूप वाईट झालं... बिचारा करण...

राजला ह्यातलं काही सांगू नका... त्याच्या खिडकीतून त्यांचं घर दिसतं.. घाबरेल तो.. आता कुठे एकटा झोपायला शिकलाय राज.

हे ऐकल्यावर राजकडे तसं काहीही सांगायला राहिलं नव्हतं.

त्याला रोज खिडकीमधे उभारलेल्या जोशीकाकू दिसतात.. त्यांच्याबरोबर करणसुदधा असतो..

दोघे शाळेतून येणाऱ्या राजकडे बघून हसतात..

# एकटा

'राहुल राहील हो एकटा.... आपलं जाणं गरजेचं आहे.... आता निघालो तर उद्या संध्याकाळ पर्यंत परत येऊ... मला पण काळजी आहे की त्याची.. त्याला जरी मी जन्म दिला नसला तरी मी त्याच्यावर तेवढंच प्रेम करते जेवढं मी पोटच्या बाळावर करेन.... तो आता चांगला 13 वर्षांचा आहे..

अगं फक्त 13 वर्षांचा आहे तो.. एवढ्या मोठ्या घरात तो कसा एकटा राहणार... घेऊन जाऊया ना त्याला...

... तुम्हाला माझं काहीच पटत नाही.. तुम्हाला असं का वाटतं कि मी त्याचं वाईट करायलाच बसलेली आहे..

आता हे काय नवीन चालू केलंयस... अहो आपण त्यांच्या अंतीमसंस्कारासाठी निघालोय... राहुल ला घेऊन जाणं **बरं** नाही... '

बरं जाऊ आपण... सांग राहुलला.. '

खोलीच्या दाराबाहेर उभारलेला राहुल आपल्या आई बाबांचं सगळं बोलणं ऐकत होता...

तशी त्याला चोरून ऐकायची सवय नव्हती..

उद्या शाळेला सुट्टी आहे हे सांगण्यासाठी तो आईकडे आलेला.. पण हे बोलणं ऐकल्यावर मात्र तो सुद्धा जरा हिरमुसला... आता आई खोली बाहेर येणार हे कळल्यावर तो जरा घोंढळला. काय करावं त्याला कळतच नव्हतं. तो सरळ आपल्या खोलीत जाऊन झोपेचं नाटक करत बेडवर पडला... कारण त्याला माहित होतं की आपण आई बाबांचं बोलणं चोरून ऐकतोय हे जर आई ला कळलं तर मात्र त्याचं काही खर नाही...

पण त्याने एक गोष्ट मात्र नक्की ठरवलेली कि आई आली कि तिचं सगळं बोलणं शांतपणे ऐकून घ्यायचं आणि तिला साफ नकार देऊन टाकायचा... आणि हा नकार जरी तिने ऐकला नाही तरी बाबा तर नक्कीच ऐकतील.. राहुलचा बाबांवर पूर्ण विश्वास होता. त्याला खात्री होती की बाबा आपल्याला एकटं सोडून जाणार नाहीत.

आपल्याच कल्पनेच्या रंगात रंगत तो बेडवर पांघरून घेऊन पडून राहिला... रात्रीचे 10 वाजलेले... त्यामुळे आत्तापर्यंत राहुलचं झोपणं काही नवीन नव्हतं...

त्याच्या विचाराप्रमाणे आई बाबा खोली मध्ये आले.. ते आलेले कळताच राहुलने कान टवकारले.

बाबा झोपलेल्या राहुलला हाक मारणार आणि तो झोपेच्या नाटकातून उठणार एवढ्यात आई बोलली...

'अहो कशाला उठवताय त्याला... जेऊन झोपलाय... उद्या कामवाली लवकर येईल. सांगते मी तिला.... ती शाळेला तयार करेल त्याला... '

हे तर अजून चांगलं झालं... समजावण्याचा प्रश्नच मिटला....

आता तो सरळ सकाळीच उठेल...

चला आपण जाऊ या... आणि हो गाडी मी चालवणार तुम्ही निवांत बसा बाजूला...

हे सगळं ऐकून राहुलला कळलं की आपण स्वतःच्या पायावर दगड मारून घेतलाय... आता तो ना उठू शकतो ना बरोबर जायचा हट्ट करू शकतो...

त्यातून ही त्याने काहीतरी कारण काढून उठायचं ठरवलं...

पण खूप वेळ झालेला.. ऊठून दरवाजाकडे जाऊपर्यंत आई बाबा गाडीत बसून गेलेले सुद्धा....

आता राहुल एकटा होता... पूर्ण घरात एकटा...

तो कसलाही विचार न करता पहिल्या मजल्यावरच्या त्याच्या खोलीत जाऊन बसला... खोलीतल्या सगळया लाइट त्याने चालू केल्या... त्या लाईटचा त्याला आधार जाणवला...

झोप येणं तसं शक्यच नव्हतं... आपल्या मूर्खपणाचा त्याला खूप राग येत होता.

काहीतरी वेळ घालवण्यासाठी करावं म्हणून त्याने लाइट लावत लावत बाबांच्या खोलीतून एक पुस्तक आणलं वाचायला...

येताना मात्र तो सगळया लाईट बंद करायचा विसरला नाही...

लाईट चालू राहिली कि आई ओरडते हे चांगलंच त्याच्या डोक्यात बसलेलं...

पुस्तक घेऊन तो बेड वर बसला....

13 वर्षाच्या मुलाच्या ऐपतीप्रमाणे त्याने एक एक अक्षर जोडत नाव वाचलं ' एकटा '.....

हे वाचून त्याला काय फार आनंद झाला नाही..

त्याच्या सध्याच्या **परिस्थिती**ला साजेस नाव असल्यामुळे तो जरा नाराज झाला.....

एवढ्यात घराची बेल वाजली... राहुल ने घड्याळयात बघितलं तर 12 वाजलेले... एवढ्या रात्री कोण? ? ? स्वाभाविक प्रश्न होता..

पण उत्तरासाठी दरवाजा उघडणे आवश्यक होतं...

त्याला काय करावं तेच कळेना.... या विचारातच असताना परत बेल वाजली... आता मात्र राहुल घाबरला... खोलीतल्या फोन वरून आईला फोन लावायला तो सरसावला... त्याने प्रयत्न केला सुद्धा... पण नंबर कुठेतरी चुकत होता.... तिसऱ्यांदा बेल वाजली.... घामेघूम राहुल गच्चीत आला...

पहिल्या मजल्यावरून त्याने दरवाजाकडे बघितलं.....

लक्ष देऊन ऐकल्यावर त्या ठोठावण्याबरोबर एक पुरुषी आवाज पण येत होता.... ' राहुल दार उघड.... मी आलो... आता तू आणि मी....

आई बाबा परत नाही येणार कधीच..... ते गेले.... खुप लांब गेले..

आणि आता तू दरवाजा उघडला नाहीस तर लाइट पण जाणार... '

राहुल ने हे सगळं स्पष्ट ऐकलं... त्याचे हात पाय थरथर कापत होते... रडकुंडीला आलेल्या राहुलला आठवलं कि त्याने आईचा नंबर शाळेच्या डायरी मध्ये लिहून ठेवला आहे...

क्षणाचा हि विचार न करता... त्या बेलकडे लक्ष न देता त्याने डायरी शोधली... आणि आईला फोन लावला...

' आई.... आई कुठं आहेस तू.... आई बोल ना... कोण तरी आलय दारावर... मला फार भीती वाटत आहे... आई... '

' हॅलो.... राहुल... दरवाजा उघड... आई गेली.. कायमची... मी सांगितलं ना तुला... '

राहुल च्या हातातून फोन खाली पडला...

आणि लाइट सुद्धा गेली.... त्याचा एक फायदा म्हणजे बेल पण वाजायची बंद झाली.... घाबरलेला राहुल अंग चोरून खोलीच्या कोपऱ्यात बसला... असंख्य प्रश्न त्याच्या डोक्यात फिरत होते...

कोण आहे तो माणूस?? आईचा फोन त्याच्याकडे कसा?? आई बाबा  कधी येणार?? तो जर घरात आला तर काय करायचं? ?

हा शेवटचा विचार करता करताच...

त्याला हाक ऐकू आली 'राहुल मी आलो....... '.

काय झालेलं हे राहुलला कळून चुकलं... तो माणूस घरात घुसलेला... आणि आवाज हॉलमधून येत होता...

थोडक्यात सांगायचं तर राहुल संपलेला... आता काय आणि कसं ??? काही न करता तो त्या कोपऱ्यात अजून आत सरकून बसला... डोळयातून अश्रू पाण्यासारखे वाहत होते...

त्याच्या त्या क्षणाची भीती तर शब्दात सांगताच येत नाही... थोड्या वेळासाठी सगळं शांत झालं... न लाईट, ना कसला आवाज... परिस्थिती जरा शांत

झाल्यावर राहुल ने थोडा धीर करून खोलीच्या दरवाजापासून खाली बघायचा प्रयत्न केला....

हॉलच्या सोफ्यावर एक माणूस बसलेला.... त्याच्या हातात एक धारदार चाकू होता... रात्रीच्या लाइट गेलेल्या परिस्थितीत त्याला ह्या पलीकडे काहीच दिसत नाही...

एक विलक्षण गोष्ट घडली... राहुल दरवाजातून बघताना त्या माणसाने वरती बघितलं... एका क्षणाची नजरा नजर...

तो हसला... का हसला हे कळायला राहुलला जरासुद्धा वेळ नाही लागला... राहुल दरवाजातून आत आला आणि त्याने दरवाजा लावला... 2 क्षणांची शांतता... आणि दरवाजावर जोरात थाप बसली... राहुलला त्याच्या छातीवर थाप बसल्यासारखं वाटलं... राहुलची छाती अक्षरशः उडत होती...

' आता बस्स राहुल... दरवाजा उघड.... मी तुला जास्त यातना नाही देणार... लगेच मारतो तुला... हां....

आताच तुझ्या आई बाबांना मारून आलोय... खूप यातना झाल्या त्यांना... पण, पण तुला नाही करणार मी असलं काही...

दार उघड राहुल... '

हे सगळं ऐकून राहुल सुन्न झालेला... त्याने धीर करून गच्चीतली काठी हातात घेतली... आता ठोठावणं वाढलेलं.. ते आता दरवाजा तुटल्याशिवाय

थांबणार नाही... राहुल ने कपाटातील बॅटरी घेतली... काय करायचं हे त्याच्या डोक्यात तयार होतं...

अंगातली सगळी शक्ती एकवटून तो उभारलेला...

दरवाजा तुटताच क्षणी राहुल ने त्या माणसाच्या डोळयावर लाईट पाडली आणि काठीने त्याच्या तोंडावर मारलं...

तो माणूस खाली कोसळला... काही विचार न करता थरथरत तो खोली बाहेर पडला... घराच्या बाहेर जाऊन त्याने... घराला बाहेरून कडी लावून घेतली... रडत रडत तो घरा च्या आजूबाजूच्या बागेतच बसला... आपलं घर किती एकांतात आहे हे त्याला पहिल्यांदा जाणवलं... एवढं होऊन सुद्धा तो थरथरत होता... त्या बागेतल्या बाकावरच त्याला झोप लागली... सकाळच्या किरणांबरोबर राहुल उठला..

एका क्षणात त्याला कालचं सगळं आठवलं... आई बाबा कुठं असणार हा विचार करत असतानाच बाबांची गाडी गेट मधून आत आली...

राहुलचा आनंद गगनात मावत नव्हता...

गाडीतून मात्र आई एकटीच उतरली.... राहुल ने पळत जाऊन तिला मिठी मारली...

झालेला सगळा प्रकार त्याने आईला सांगितलं... तिच्या तोंडावरचे भाव एकदमच पालटले.. तिने त्याला परत मिठीत घेतल.... चल बघू कोण आहे तो...

म्हणून ती घराकडे निघाली... राहुल घाबरलेला पण आईचा आधार होता त्याला... घरात गेले तर कोणीच नव्हतं...

' मी मी खोटं नाही बोलत आई... खरंच कोणीतरी होतं...

मी त्याच्या डोक्यात काठी मारली... आई ने एका क्षणासाठी राहुलला बघितलं.. '

मला आहे विश्वास तुझ्यावर बाळा... खाली जाऊन बघितल्यावर कळलं की घराच्या मागचा दरवाजा उघडाच होता..

आई हा उघडा कसा राहिला गं...

' मीच ठेवला... नाहीतर तो माणूस आत कसा आला असता तुला बाबांकडे पोहचवायला?.... '

राहुलने वर बघितल आई हसत हसत हातातल्या चाकू बरोबर खेळत होती........

# फोटोग्राफर

काळोखात बुडालेल्या बस स्टँडवर एका दिव्याच्या खाली लाकडी बाकावर राहुल एकटाच बसलेला. तो आणि आवाज करणारे रात्रकिडे हेच तिथे एकमेकांचे साथी. अंगात जीर्ण होत चाललेले कपडे. हातात एक कापडी मोठीं बॅग आणि गळयाभोवती मळकटलेला मफलर... या पलीकडे त्याच्याकडे काहीच सामान नव्हतं.. हा! पण तोंडावर चिंतेचे भाव मात्र नक्की होते..

आणि भाव का नसणार? कुणाला रात्री बारा एक वाजता एखाद्या सुनसान स्टँड वर बसायला **बरं** वाटेल. रात्रीची 11ची या अनोळखी गावातून बदलायची बस चुकल्यामुळे तो तिथे बसलेला.. हातात घड्याळ नसल्यामुळे वेळेचा अंदाज नव्हता. त्यात भर म्हणूम थंडीसुद्धा वाढत चाललेली.. वातावरणात धुक दिसायला चालु झालेलं. खांबावरच्या दिव्याच्या धुरकट होत चाललेल्या प्रकाश बघून राहुलला धुक्याचा अंदाज आला. धडधाकट शरीरयष्टी आणि तारुण्याचं बळ, म्हणूनच राहुल ती थंडी सहन करू शकत होता.

अनोळखी गाव..

आधीच्या बस मधून उतरल्यावर काही खायला मिळत का हे बघण्यासाठी तो जरा स्टॅन्ड च्या बाहेर गेला... आणि त्याची बस चुकली... सगळं त्याच्या मूर्खपणामुळेच झालेलं..

गाव तस छोटंसं असावं... हा अंदाज राहुलने बस स्टॅन्ड च्या अवस्थेवरून लावलेला.. बसायला दोन बाक, सुदैवाने चालू असलेला एक दिवा आणि ड्राइवरला आराम करायला एक खोली. या पलीकडे त्या स्टँडवर काहीही नव्हत. राहुलकडे तिकिटाचे मोजकेच पैसे होते.. त्यामुळे गावात राहायला लॉज शोधण्यात सुद्धा त्याला काही अर्थ वाटला नाही.. आणि बस स्टँडची अवस्था बघून त्याला गावात जावंसंसुद्धा वाटलं नाही. दुसरी बस कितीला येणार ह्याची सुद्धा त्याला माहिती नव्हती.. आपण इथे आलोच का? माहितीचा मार्ग सोडून अनोळखी गावातून जायचा आपला निर्णय किती चुकला हे या सगळया परिस्थितीमुळे त्याला कळून चुकलेलं.

या सगळया अज्ञानामुळे आणि पैशाच्या अभावामुळे त्याने स्टॅन्डवर बसून राहणेच पसंत केले... पण थंडी त्याला खूप त्रास देत होती... पोटाला बॅग चिटकवून बसलेल्या राहुलला बस स्टॅन्ड मध्ये एक माणूस येताना दिसला... सुरवातीला त्याचा फक्त आकार दिसत होता. जरा जवळ आल्यावर त्या व्यक्तीचा चेहरा दिसला. स्मित हास्य होत त्या चेहऱ्यावर. या कडाक्याच्या थंडीमध्ये असा कुठला व्यक्ती आपल्याकडे बघून का हसेल? हा प्रश्न राहुलला जरा त्रास देत होता.

पण राहुलला जरा बरं वाटलेलं... राहुलला सोबतीला कोणी तरी पाहिजेच होतं... येणाऱ्या व्यक्तीच्या गळयात पण एक बॅग होती पण ती कपड्यांची नसावी. कारण ती भरपूर छोटी होती. गळ्याभवती पट्ट्याने अडकवलेली.

दिसायला मध्यमवयीन... उंची बेताची.... हसऱ्या चेहऱ्याचा तो व्यक्ती येऊन राहुलच्या बाजूला बाकावर बसला.. आणि परत हसला...

राहुल तोंडावर दाखवत नव्हता पण मनात कुठेतरी त्याला खूप बरं वाटलेलं... राहुलला बोलायचं होतं. स्वतःचा आवाज ऐकायचा होता. पण काय बोलायचं हे न कळल्यामुळे राहुल गप्पच बसलेला. पाच- दहा मिनिटांच्या शांतते नंतर त्या व्यक्ती ने स्वतःहून विचारल ' कुठं जाणार आहात? ? ? ' आणि स्वतःच हसून बोलला कि ' काय फरक पडतोय म्हणा सकाळशिवाय कुठलीच बस येणार नाही इथे... '.. या वाक्याने मात्र राहुल थोडा घाबरला.. त्याच्या मनात भीती पसरली. राहुलने त्या व्यक्तीकडे नजर टाकली आणि विचारलं की ' तुम्ही कुठं निघालाय ? ? ? आणि बसची एवढी माहिती असून सुद्धा आता का आला बरं स्टॅन्ड वर ? ? ' हे विचारताना राहुलची नजर त्याच्या बॅगेवर खीळलेली.

तसा राहुलच्या डोक्यात आजून एक प्रश्न होता पण तूर्तास त्याने तो ओळख वाढवण्यासाठी  बाजूला ठेवला..

तो व्यक्ती परत हसला... अहो मला कुठं ही जायचं नाही... मी इथेच राहतो... याच गावात...

मग तुम्ही इथे का बसलाय??? कोणी येणार आहे का?? काही हरवलंय का इथे.... राहुलच्या मनातल्या असंख्य प्रश्नांतले काही प्रश्न त्याने बोलून दाखवले..

नाही हो माझं काहीही हरवलेलं नाही... मी कुणाची वाटही बघत नाही.. कोण येणार माझ्याकडे...

जाता जाता तुम्ही दिसला म्हणून आत आलो.. एकटं माणूस काय करतंय इथं म्हणून बघायला आलो तुम्हाला.

आपण ओळखतो एकमेकांना ? ? ? राहुलने त्याला विचारले.

"नाही. "तो बोलला... "पण काय गरज आहे का त्याची.. ओळख तर कधी ही होऊ शकती"...

राहुलला हे मात्र मनापासून पटलं...

आता मात्र राहुलसुद्धा हसायला लागला... आणि मघापासून मनात असलेला प्रश्न त्याने शेवटी विचारला,

' या तुमच्या गळयातल्या पिशवीत काय आहे हो... कपडे तर नसावेत... वेगळीच पिशवी आहे ही '...

एवढं ऐकून तो व्यक्ती जोरात हसला... जरा जास्तच जोरात..

त्या शांततेला चिरत फाडत तो आवाज राहुलच्या कानावर पडला...

त्या व्यक्तीने हळू बॅगची चेन उघडली आणि एक काळया रंगाचा कॅमेरा बाहेर काढला... राहुल बघतच राहिला.

राहुल कडे बघत.... अचानक पणे त्याचा फोटो काढत तो बोलला... मी फोटोग्राफर आहे.... ह्या सगळया क्रिया एवढ्या पटपट झाल्या की राहुल क्षणासाठी गोंधळला... काय चाललंय हे त्याला कळलंच नाही... कॅमेरा ही गोष्ट त्याने ऐकली होती... लांबून बघितलीही होती... पण कोणी त्याचा फोटो काढावा हा तसा पहिलाच प्रसंग.. त्या घाईगडबडीत त्याला म्हणावं तसं हसता पण आलं नव्हतं..

राहुलने कॅमेरा निरखून पाहिला.. त्याच्यासाठी ही खूप वेगळी वस्तू होती.

मला, मला पण शिकायचं आहे हे वापरायला... या राहुलच्या बोलण्यात उत्सुकता होती. भयानक उत्सुकता.

राहुलच्या या शब्दांबरोबर फोटोग्राफरने त्याला कुठलं बटण दाबलं कि फोटो निघतो, फोटो काढताना कॅमेरामध्ये कुठून बघायचं या सर्व गोष्टी दाखवल्या...

मी तुमचा फोटो काढू का? ? या राहुलच्या प्रश्नाने फोटो ग्राफर  बोलला. ' काढा काढा.. '

राहुलने सांगितलेल्या गोष्टी अनुसरून त्याचा फोटो काढला..

त्या अंधारात रस्त्याकडेच्या दिव्याच्या प्रकाशातला तो फोटो..

आता राहुल जरा मोकळा झालेला... आणि थोडा खुशसुद्धा...

बसची चिंता.. थंडीचं वातावरण या सगळयांतून तो मुक्त झालेला..

आपलं नाव विचारायचं राहीलच की ? ? ?

मी राहुल.... आणि तुम्ही? ? मी फोटोग्राफर. तो बोलला...

ते ठीक आहे हो पण तुमचं खरं नाव काय? ? राहुलचा हा प्रश्न त्याला बहुधा अपेक्षित असावा.. कारण तो प्रश्न ऐकताच क्षणी तो बोलला 'नावात काय आहे राहुल साहेब'... माणसाला कामावरून ओळखायला पाहिजे...

खूप रात्र झाली आहे... चला माझ्याबरोबर माझ्या घरी...

रात्रभर इथे बसून काय करणार? ? आता तर आपली ओळख पण झाली आहे.. त्याचं हे म्हणणं राहुलला पटलं... जास्ती विचार न करत त्याने एका क्षणात होकार दिला..

दोघे चालायला लागले... त्या स्टँडमधून बाहेर पडले. फोटोग्राफरची नकळत नजर राहुलच्या बॅगवर पडलेली...

तुम्ही काय करता हो? ? त्याने पण जरा उत्सुकतेनेच राहुलला विचारले.

मी गावा गावात जाऊन चांदीचं सामान विकतो... म्हणजे मी काही व्यापारी नाही... माझा मेहुण्यासाठी मी हे काम करतो..

बायकोचा भाऊ त्यामुळे त्याचा तसा माझ्यावर विश्वास पण आहे... आणि मला ही चार पैसे मिळतात...

पण लै त्रास देतो तो मला... राबवून पण खूप घेतो..

माझी बायको पण त्याच्याकडूनच बोलती... मला किंमतच देत नाही.. हे सांगताना राहुलचे डोळे लाल झालेले. आवाजाही थोडा वाढलेला. पण चांदी या शब्दापुढे फोटोग्राफरला काही ऐकूच आलं नाही.. त्याने काही ऐकलंच नव्हतं.

चांदी हा शब्द ऐकून फोटोग्राफर ची नियत कुठेतरी फिरली..

पिशवीमध्ये चांदी असणारच... त्याच्या डोक्यात हा विचार येऊन गेला..

तुमच्याबद्दल काय तरी सांगा कि राव... नाव पण सांगेना मला..

राहुल बोलून गेला..

मी मदन... इथं आसपासच्या गावात फोटोग्राफर म्हणून काम करतो... चार पैसे मिळतात... बायको होती पण वर्षभर झालं सोडून गेली मला एकट्याला.

पैसे नसणाऱ्या माणसाबरोबर कोण राहणार? ?

ह्या प्रश्नाला ऊत्तर असं काही नव्हतच राहूलकडे.. कारण तोसुद्धा गरीबच होता.

मदन कितपत खर सांगत होता त्यालाच माहित...

त्याला ती चांदी मात्र नक्की पाहिजे होती...

तुम्हाला त्रास नको मदन भाऊ.... मी आपला स्टॅन्डवरच बरा आहे... आधीच तुमचे वांदे आणि त्यात माझं ओझं तुमच्यावर..

राहुल परत निघाला.. राहुलला त्याच्या घरी जाणे बरं वाटत नव्हतं.

मदनला काय करावं तेच कळेना... राहुल गेला म्हणजे चांदी पण गेली... तो जरा गोंधळला. गडबडीत त्याने राहुलला थांबवलं...

चला हो... काय त्रास नाही तुमचा... तुम्हाला एक गंमत सांगतो.. काहीतरी सांगायचं आणि राहुलला गुंतवून ठेवायचं म्हणून त्याने एक काल्पनिक गोष्ट सांगायला सुरू केली.

हा कॅमेरा जरा वेगळाच आहे... तुम्ही ऐकून तरी घ्या माझं..

राहुलने कान टवकारले... काय आहे असं? ? ?

तुम्ही चला हो.. मी सांगतो.. त्या अंधाऱ्या रस्त्यावर दोघे चालायला लागले..

या कॅमेऱ्यातून मी ज्याचा फोटो काढतो ना तो थोड्याच वेळात किंवा काही दिवसात मरतो...

हे ऐकून राहुल एकदम दचकला... काय बोलाव त्याला कळेनाच..

तुम्ही माझा फोटो काढला ना ह्याने? राहुलने घाबरतच मदनला विचारले.

हो मदन एकदम शांतपणे म्हणाला.... पण तुम्ही नाही मरणार... माझी फोटो काढताना तशी इच्छा असली तरच माणूस मारतो...

राहुलला काही कळत नव्हतं... तुम्हांला काही होणार नाही.. मदन त्याला समजावत होता.

आणि समजा मी जे सांगतोय ते खोटं असेल तर तुम्हीपण माझा फोटो काढला आहेच की... मीपण मरेन..

राहुलला हे मात्र पटलं.. आणि त्याला जरा बरं पण वाटलं... बोलण्याच्या गुंतागुंतीत मदनने राहुलला घरापर्यंत तर आणलं होतं...

खोटं बोलून का होईना पण त्याने अर्धा हेतू साध्य केलेला..

ते दोघे घरात गेले... घर म्हणजे काय तर दोन कौलारू खोल्या. त्या पण कधी पडतील याचा नेम नव्हता.

मोहन च्या परिस्थितीप्रमाणे होतं ते जेवण जेऊन ते बसले.

माझा मघाशी काढलेला फोटो मला बनवून द्या की...

राहुल बोलला..

मदन मनात हसला... त्याने विचार केला की हा व्यक्ती माझ्या जाळयात अडकलाय.. त्याला आपलं बोलणं पटतंय.. जबरदस्तीने किंवा घाबरवून आपण चांदी मिळवूच... मदनचा आत्मविश्वास वाढलेला.

त्याने दोघांचे फोटो बनवून आणले.. आणि वाळण्यासाठी दोऱ्याला चिमट्याने अडकवले...

झोपा राहुलराव... उद्या सकाळी उठवतो तुम्हांला.. बोलत बोलत त्याने राहुलला चादर दिली.

अरे हो.. एक गोष्ट सांगायची राहिली... माणूस मरायच्या आधी त्याचा फोटो पण कोरा होतो.. अगदी पांढऱ्या कागदा सारखा..

असो... तुम्हांला काय म्हणा त्याच... तुम्हांला काही होणार नाही..

झोपा.. मी पण झोपतो... मदनने जाता जाता राहुलची चिंता वाढवलेली.

राहुल झोपायला गेला... कुठेतरी तो कॅमेरा त्याच्या डोक्यात बसलेला...

रात्री चारच्या सुमारास मदन आपला हेतू साध्य करण्यासाठी ऊठला.. अंधारातच धडपडत राहुलच्या पिशवीत चांदी शोधताना त्याचं एकदम लक्ष गेलं तर राहुल त्याच्या मागे उभा होता... हातात चाकू घेऊन..

मदन घाबरला... चल तो कॅमेरा मला दे... राहुलचा आवाज विचित्र झालेला.

मदनला काही कळेना... आपली चोरी पकडली गेली ह्या गोष्टीमुळे तो जरा नाराज झाला... पण राहुलच्या हातातला चाकू बघून मात्र तो घाबरला...

आपला डाव आपल्यावरच उलटला.. हे त्याला कळून चुकलं..

राहुल चे डोळे लाल झालेले...

तो बोलत होता.. कॅमेरा दे तो... माझ्या मेहुण्याला आणि बायकोला मारायचा खूप दिवसांपासून विचार होता मनात..

त्या कॅमेऱ्याने काम सोप्पं होईल माझं..

मदन फार घाबरला.. तो खून, चाकू हे सगळं ऐकून, बघून मटकन खालीच बसला...

अरे तसलं काही नाही रे... मी खोटं बोललो...

मला तुझी चांदी चोरायची हाती.. मदन अक्षरशः राहुल पुढे दयेची भीक मागत होता.

राहुलचे डोळे लाल भडक झालेले..

राहुल बोलला, "मला पण सगळं खोटं वाटलेलं... जन्मात पैसे साठवून मी तो कॅमेरा घेऊ शकत नाही.. पण तुझा फोटो काढताना मनात कुठंतरी येऊन गेलेलं की तू मरावास आणि हा कॅमेरा मला मिळावा".... मदन खूपच घाबरलेला.. काय बोलवतच नव्हतं त्याला..

तर तू असा नाही देणार मला कॅमेरा... तू मरणार... माझ्यामुळे नाही.. तुझ्याच फोटो मुळे... खोटं आहे ना सगळं मग मागं बघ.. राहुल ओरडत होता.

मदन वळला..... तिथे फक्त राहुलचा फोटो होता...

मदनचा फोटो कागदा सारखा कोरा... त्या मोठ्या घाबरलेल्या डोळयांनी तो पुढे बघायला वळला...

तर राहुल चाकू घेऊन त्याला मारण्यासाठी सरसावत येत होता..

स्वतःचा अंत बघून... त्याने डोळे मिटले...

कायमचे...

# राक्षस

मी निखिलला मागच्या महिन्यात भेटलो...

पण नंतर मला वाटलं की मी त्याला का भेटलो? ? काही गरज होती आम्हाला भेटायची ? ? मला चांगल आठवतंय माझ्या श्रेयस नावाच्या मित्राने माझी ओळख करून दिलेली निखिल बरोबर... उंच, अंगाने तसा धिप्पाड निखिल पहिल्यांदा माझ्यासमोर आला तसा मी जरा घाबरलोच. अंहं! त्याच्या शरीरयष्टीची भीती नव्हती वाटली मला, तो ज्या नजरेने माझ्याकडे बघत होता ती नजर फार भयानक होती. तो हसलासुदधा.

मी नकळत जरा मागे झालो.. आणि त्याच क्षणाला डोक्यात ठरवून टाकलं की या निखिल बरोबर जास्त ओळख नाही वाढवायची. यात धोका आहे. हे बरोबर नाही.

त्या नंतर पार्टी चालू झाली. खरंतर त्या दिवशी श्रेयस चा वाढदिवस होता. श्रेयसला मी खूप दिवसांपासून ओळखतो पण या निखिलला मी पहिल्यांदाच बघितलेलं.. पण या गोष्टीवर विचार करायची ना ती वेळ होती ना जागा. निखिल चा विचार बाजूला ठेवत काही क्षणात मी पण त्या पार्टीच्या रंगात रंगलो. आणि

का नाही रंगायचं? श्रेयस माझा खूप चांगला आणि एकमेव मित्र होता. मला खूप मित्र करायला आवडत नाहीत अशातला भाग नाही. पण लोकांना माझ्याबरोबर मैत्री करण्यात जास्त रस नसतो. हे असं माझं मत आहे.

का कुणास ठाऊक? ? श्रेयस आणि मी कधी पासून एकत्र आहोत हे सुद्धा मला नीट आठवत नाही. कारण त्या वेळेस मी एवढा लहान होतो की मला काही नीट कळत सुद्धा नव्हतं. लहानपणीच माझ्या बाबांचा अकाली मृत्यू झाला. श्रेयस च्या बाबांनी आम्हाला खूप मदत केली. श्रेयस सुद्धा अगदी त्यांच्या सारखाच आहे.

"अरे मित्रा! एकटा काय करतोयस इथं? चल काहीतरी खाऊ या. "

श्रेयस ने नेहमी प्रमाणे माझा एकांत घालवण्यासाठी मला खायला नेलं. श्रेयसची पार्टी म्हटल्यावर खाण्याला काही तोड नाहीच. मला तिथे सोडून तो परत पाहुण्यांकडे गेला.

मी प्लेट घेऊन टेबलावर बसलो. पहिलाच घास खाणार एवढ्यात तो निखिल एका ताटात 3-4 कोंबड्या घेऊन माझ्या समोर बसला. त्याचं ते ताट बघूनच माझी जेवायची इच्छा गेली. काही न बोलता मी जेवायला लागलो. मला तिथे खरंतर बसायच नव्हतं. पण असं उठून तरी कसं जाणार. खाता खाता तो काही तरी बडबडला. गरज नसतानासुद्धा मूर्खासारखं मी त्याला काय म्हणून विचारलं. तर तो म्हणाला हे मांस शिजवायची काही गरज होती का? आणि हसला.

त्याचं ते बोलणं फार विचित्र होत. मांस का शिजवलं? काय आणि कसला प्रश्न होता हा? असं कच्चं मांस कोण खातं? हा असा विचार डोक्यात आला आणि मी

न जेवताच तिथून उठलो. मला तिथे एक क्षण सुद्धा थांबायची इच्छा नव्हती. श्रेयस तर मला असं जाऊन देणार नाही. काही तरी कारण काढायचं म्हणून मी त्याला बरं वाटत नाही असं सांगितलं आणि घरी गेलो.

तिथून बाहेर तर पडलो मी पण तिथून माझी सुटका झाली नव्हती. पूर्ण रात्र माझ्या डोक्यात फक्त तो निखिल आणि त्याचं ते विचित्र हसणं आणि बोलणंच चाललेलं. त्याची वागणूक थोडी विचित्रच होती. श्रेयस त्याला कसा भेटला असावा बरं? खरंच सांगतो मला त्या क्षणाला ना झोप लागत होती ना माझ्या प्रश्नांची उत्तरं मिळत होती. दुसऱ्या दिवशी अचानक एका कामामुळे मला गावी जावं लागलं. श्रेयसला भेटणं लांबणीवर पडल. काम संपवून परत येईपर्यंत निखिल हा विषय तसा मी विसरूनच गेलेलो. गावावरून आलेल्या दुसऱ्या दिवशी मी श्रेयसला भेटायचं ठरवलं. रविवार असल्यामुळे भेटायला तशी काहीच अडचण नव्हती. आवरून मी घराचं दार उघडणार एवढ्यात बेल वाजली. 'कोण आहे बरं' या विचारात दरवाजा उघडला तर पुढे स्वतः श्रेयस आलेला मला भेटायला. दरवाज्यातून आत आल्या आल्या त्याने मला मिठी मारली. मित्राला खूप दिवसांनी भेटायचं आनंद एका क्षणात मावळला कारण त्याच्या मागे निखिल उभा होता.

डोक्यातून गेलेल्या सर्व गोष्टी क्षणात आठवल्या. नाईलाजाने तोही घरात आला. माझं त्याच्यावर बारीक लक्ष होत. तो घर खूप निरखून पाहत होता. काही तरी शोधत असावा. पण काय? ?

पोहे खाताना माझं लक्ष गेलं आणि मला त्याचे दात दिसले. दात नाही तर ते सुळे होते. अगदी एखाद्या प्राण्याच्या तोंडात असतात तसे. हाताने खुर्चीला घट्ट धरून मी बसलेलो. श्रेयस ला सांगायचं तरी काय आणि कसं.

श्रेयस च्या बोलण्यातून एक गोष्ट कळली की निखिल ने त्याला माझ्याकडे घेऊन यायला आग्रह केलेला. ज्या व्यक्ती पासून मी लांब पळायचा प्रयत्न करत होतो तोच माझ्या मागे लागलेला.

या निखिलबद्दल श्रेयस बरोबर चर्चा करणे खूप खूप गरजेचं होतं. दोन दिवसातच मी कामातून थोडा वेळ काढून श्रेयसकडे गेलो. बोलता बोलता निखिलची चौकशी केली. त्याच्या बोलण्यात असं कळलं की हा निखिल त्यांच्या ऑफिस मध्ये नवीन कामाला लागलाय आणि तो जवळच्या गावात राहतो. मी फक्त चौकशी केली. त्याला काहीच बोललो नाही कारण काय बोलायचं हे मलाच कळत नव्हतं. पण या निखिलचा शोध घ्यायचा असं मी नक्की ठरवलं. मला त्याचा त्रास होत होता म्हणूनच मी ठरवलं की आपण या गोष्टीच्या मुळापर्यंत जायचं. श्रेयसला सुद्धा निखिल बद्दल पाहिजे तेवढी माहिती नव्हती.

ऑफिस मध्ये सुट्टी टाकून मी श्रेयसने दिलेल्या पत्त्यावर गेलो. कोल्हापूर पासून काही अंतरावरच होत ते गाव. एवढ्या लांब का बरं राहत असावा हा निखिल एकटा?? कदाचित भाडं परवडत नसावं म्हणून. दिलेल्या पत्त्यावर पोहचलो तर तिथे एक घर होतं. अगदी छोटं घर ते पण गावाच्या वेशीवर. मी अशी वेळ साधून गेलेलो ज्या वेळेस निखिल ऑफिसमध्ये असण्याची शक्यता जास्त होती.

घर घरासारखं होतं पण एक गोष्ट मला खटकली ती म्हणजे घराबाहेर असलेला पिंजरा ज्या मध्ये भरपूर कोंबड्या होत्या. जरा खोलात जायचं म्हणून मी घरामागे एक चक्कर मारली. आणि इथे मात्र मी परत एकदा घाबरलो. सगळीकडे वेगवेगळया प्रकारची हाडं आणि जमिनीवर रक्ताचे शिंतोडे पडलेले. गोष्टी वाटत होत्या त्यापेक्षा भयानक होतं चाललेल्या.

इथे रात्री काय होतं हे आज बघायचंच असं मी ठरवलं. निखिलच्या ऑफिसमधून यायच्या वेळेस मी बरोबर झाडीत लपून बसलो. तो गाडी वरून आला. जरा चिडलेलाच दिसत होता. त्या नंतर जे झालं ते फार विलक्षण होतं. तो आला, गाडीवरून उतरला. घरात जाता जाताच पिंजरा उघडून एक कोंबडी आत घेऊन गेला. आत जाताच त्याने खिडक्यांचे पडदे लावले. दहा पंधरा मिनिटाने घराचा मागचा दरवाजा उघडला. तोंडाला रक्त लागलेला निखील कोंबडीची हाडे आणि पिसे घेऊन बाहेर आला आणि त्याने ती टाकून दिली.

हे सगळं बघताना माझा पाय घसरला आणि मी पडलो. पडता क्षणी त्याचं लक्ष माझ्याकडे गेलं. अंधार असल्यामुळे त्याने माझा चेहरा बघितला का नाही माहीत नाही पण मी तिथून पळत सुटलो. मला वाटलं की तो माझा पाठलाग करेल पण तसं काहीच झालं नाही. त्या क्षणाला या गोष्टीमुळे मला बरं वाटलं पण त्यातून पुढे काय होणार होतं याचा मला अंदाज सुद्धा नव्हता. ती रात्र मी फक्त या विचारात घालवली की निखिल ने आपल्याला बघितल होतं की नाही आणि जर बघितलं असेल तर? ?

पुढच्याच दिवशी श्रेयस निखिलला घेऊन मला भेटायला आला. मी मनातून घाबरलेलो की आता काय होणार. पण दरवेळीस आपल्याला वाटतं तसं थोडीच घडतं. थोड्या वेळेच्या गप्पांनतर ते निघाले. बोलण्याच्या नादात श्रेयसचं बोट दरवाज्यात अडकलं. सगळं बोट रक्ताने भरलेल. त्याच्या त्या बोटाकडे निखिल वेगळयाच नजरेने बघत होता.

इथे मला सगळं कळून चुकलं. निखिल एक सामान्य माणूस नव्हता. आणि श्रेयसला त्याच्या पासून खूप धोका होता.

पुढच्या दोन तीन रात्री मला झोपच लागली नाही. एक वेगळीच बेचैनी जाणवत होती. श्रेयस ला भेटावं म्हटलं तर त्याचा काही पत्ताच लागत नव्हता.

काय झालं असावं? फोन पण लागत नाही? त्याच बोट कसं असेल? बोट हा विचार डोक्यात आला आणि क्षणात सगळं आठवलं. श्रेयसचं ते रक्त बंबाळ बोट. मला माहित होतं की श्रेयस कुठे असू शकतो.

काही न विचार करता मी उठलो आणि निखिल च्या घराकडे गेलो. घरातून विचित्र आवाज येत होता. ओरडण्याचा किंचाळण्याचा. मी क्षणाचा ही विचार न करता सरळ घरात घुसलो. बघतो तर श्रेयसला खुर्चीला बांधलेलं आणि निखिल जिवंतपणी त्याचं पोट फाडून रक्त पिण्याचा प्रयत्न करत होता.

निखिलने माझ्या कडे बघितलं आणि तो हसला. अगदी त्या पहिल्या भेटीत हसला तसा. त्याला पहिल्याच भेटीत सगळं कळलेलं. पण मलाच विश्वास

बसत नव्हता. असं कसं असू शकतं? पण गोष्टी आता पूर्ण साफ झालेल्या. तो माझ्या सारखाच होता. तो सुद्धा राक्षस होता. मी त्याच्यापासून लांब राहत होतो कारण मला वाटलं तो माझं सत्य जगासमोर आणेल. पण आता घाबरण्याचं काही कारण नव्हतं. त्या तीन दिवसांच्या बैचैनीचं कारण माझ्या समोर होत. श्रेयस आणि त्याचं ते लाल रक्त.

मी स्वतःला नाही थांबवू शकलो. बिचारा श्रेयस.

माझा मित्र ओरडत किंचाळत राहिला....

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

“Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow.”

– Oliver Wendell Holmes

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.

किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.